|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/ ११९० /२०२१ दिनांक: २५.०५.२०२१

प्रति,

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत**
**सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक........**

**विषय** :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी सत्रातील माहे मे, जून व जुलै २०२१ मध्ये होणा-या परीक्षांकरिता ऑनलाईन शुल्काबाबत सूचना..........

**संदर्भः**-१) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ७६/२०२१,जा.क्र.उमवि/७-अ/माहे मे, जून, जुलै-२०२१/ ९१४/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१

२) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७-अ/९४३/२०२१, दिनांक ०४.०५.२०२१.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यांत येते की, विद्यापीठाच्या संदर्भिय क्र.०१ च्या परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी सत्रातील माहे मे, जून, जुलै २०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षांकरीता विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्थांसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याबाबतचा कार्यक्रम, आवश्यक त्या सर्व सुचनांसह कळविण्यात आलेला असून, संदर्भिय पत्र क्र.०२ अन्वये त्यात अधिकच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या.

त्याचप्रमाणे ऑनलाईन अर्ज शुल्कासह सादर करणेसंदर्भातदेखील खालीलप्रमाणे सविस्तर सूचना देण्यात आल्या होत्या.

१) परीक्षा अर्ज भरतेवेळी ऑनलाईन फी भरण्यासाठी शक्यतो डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंगचा वापर करावा.

२) **यु.पी.आय.व्दारे भरणा शक्यतो टाळावा.**

३) ऑनलाईन परीक्षा फी भरतेवेळी काही कारणास्तव विद्यार्थ्यांच्या अकाऊंटमधून फी डेबिट झाली, तथापि, फॉर्म भरला गेला नसेल तर, पुन्हा पेमेंट करु नये.

४) ज्यांची परीक्षा फी अकाऊंटमधून डेबिट झाली, परंतु फॉर्म भरला गेला नाही, अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म तीन ते चार दिवसांमध्ये बँक reconciliation नंतर auto submit होईल. तरी त्यासाठी पुन्हा फी भरण्याची घाई विद्यार्थ्यांनी करु नये.

तथापि, वरील मुद्दा क्र.०४ मध्ये नमूद केलेल्या बाबीनंतरही जर विद्यार्थ्यांच्या अकाऊंटमधून दुस-यांदा फी डेबिट झाली आणि Transaction Unsuccessful असा संदेश आला असेल तर, विद्यार्थ्याने अशी जादाची भरलेली रक्कम refund मिळणेसाठी विद्यार्थ्यांने आपले नांव, मोबाईल क्र., पीआरएन व Transaction ID, Bank Name, Account No., IFSC Code,व रक्कम इत्यादी माहितीसह आपली अडचण थोडक्यात नमूद करुन, refunds@nmu.ac.in या मेल आयडीवर मेल करावा तसेच त्यापुष्ठ्यर्थ Bank Statement ची Scan Copy, SMS चा Screen Shot ई-मेलसोबत पाठवावे, जेणेकरुन अशा प्रकरणी त्वरीत कार्यवाही करणे सोईचे होईल.

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ